दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी... epaper.rayatsamachar.com
# रयत समाचार
खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी
संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक
• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ४८१ वा • सोमवार, ता. २९ डिसेंबर २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००

# नव्या तंत्रज्ञानातून देशाचा विकास शक्य- शरद पवार

## ‘शरदचंद्र पवार सेंटर ऑफ एक्सलन्स इन आर्टिफिशियल इंटेलिजन्स’चे उद्घाटन

**बारामती । रयत समाचार**

विद्या प्रतिष्ठानच्या गदिमा सभागृहात आयोजित ‘शरदचंद्र पवार सेंटर ऑफ एक्सलन्स इन आर्टिफिशियल इंटेलिजन्स’ या नूतन वास्तूच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थितांशी संवाद साधताना ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी देशाच्या विकासात नवतंत्रज्ञान, उद्योग आणि तरुणांची भूमिका महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन केले. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योगपती गौतम अदानी, प्रीती अदानी, सुप्रिया सुळे, रोहित पवार तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर यावेळी उपस्थित होते. शरद पवार म्हणाले की, बारामतीत देशातील पहिले अशासकीय स्वरूपाचे आर्टिफिशियल इंटेलिजन्स सेंटर ऑफ एक्सलन्स उभे राहत असून ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. नव्या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून देशाला पुढे नेण्याचा हा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. या केंद्राच्या उद्घाटनासाठी गौतम अदानी यांची उपस्थिती ही विशेष आनंदाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले. गौतम अदानी यांच्या कार्याचा उल्लेख करताना पवार म्हणाले की, त्यांनी शून्यातून सुरुवात करून आज देशातील



आघाडीचा उद्योगसमूह उभा केला आहे. गुजरातमधील बनासकांठा जिल्ह्यातील पालनपूरसारख्या छोट्या भागातून मुंबईत येऊन संघर्षातून त्यांनी स्वतःचा उद्योग उभारला. कष्ट, चिकाटी आणि सातत्य यामुळेच ते यशस्वी झाले. आज अदानी समूह देशातील २३ राज्यांमध्ये कार्यरत असून लाखो लोकांना रोजगार उपलब्ध करून देत आहे. बंदरनिर्मिती, विमानतळ, वीज निर्मिती, सौरऊर्जा, पायाभूत सुविधा अशा अनेक क्षेत्रांत अदानी समूहाने भरीव योगदान दिले आहे. देशाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावणारे हे प्रकल्प दीर्घकाळ रोजगारनिर्मिती करणारे असल्याचेही पवार यांनी नमूद केले. आज देशभरातील अनेक बंदरे, विमानतळ आणि ऊर्जा प्रकल्प त्यांच्या माध्यमातून कार्यरत असून यामुळे लाखो कुटुंबांचे जीवनमान सुधारले आहे.

डेटा सेंटरसारख्या नव्या प्रकल्पांमुळे भविष्यात मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होणार असून, अशा प्रकल्पांचा काही भाग बारामती व परिसरात उभारण्याबाबत आवश्यक ते सर्व सहकार्य दिले जाईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. या भागातील तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी शासन आणि स्थानिक नेतृत्व पूर्ण ताकदीने साथ देईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमादरम्यान विजय शिर्के यांनी या नव्या उपक्रमासाठी अडीच कोटी रुपयांची देणगी दिल्याची घोषणा केली. हे योगदान तरुण पिढीच्या विकासासाठी आणि नव्या प्रकल्पांसाठी वापरण्यात येईल, असे शरद पवार यांनी सांगत त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. गौतम अदानी व प्रीती अदानी यांनीही यावेळी आपल्या भावना व्यक्त करत देशाच्या भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता व नवतंत्रज्ञानाची भूमिका अधिक महत्त्वाची ठरणार असल्याचे सांगितले. तरुणांनी नव्या संधींचा लाभ घ्यावा व नवकल्पनांमधून भारताला जागतिक पातळीवर पुढे न्यावे, असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमास खा. सुनेत्रा पवार, राजेंद्र पवार, युगेंद्र पवार, अशोक प्रभुणे यांच्यासह राज्यातील विविध क्षेत्रांतील मान्यवर, शिक्षणतज्ज्ञ, उद्योग प्रतिनिधी, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाविकास आघाडीचं फिस्कटलं? बैठकीला राष्ट्रवादीची दांडी

**पुणे । रयत समाचार**

पुणे महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीत मोठी खळबळ उडाली असून, आघाडीमध्ये फूट पडण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. जागावाटपाबाबत अत्यंत महत्त्वाच्या बैठकीला शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या नेत्यांनी दांडी मारल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपली असताना, मविआमधील जागावाटप अद्याप अंतिम झालेले नाही. या पार्श्वभूमीवर पुण्यात ठाकरे गट आणि काँग्रेस पक्षाच्या बैठका सुरू होत्या. सुरुवातीला या बैठकींना राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे नेते सहभागी होत होते; मात्र आजच्या महत्त्वाच्या बैठकीला त्यांनी अनुपस्थिती दर्शवली. ठाकरे गट आणि काँग्रेसच्या नेत्यांनी राष्ट्रवादीच्या नेत्यांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता ते ‘नॉट रीचेबल’ असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसला पुण्यात महाविकास आघाडीच्या माध्यमातून निवडणूक लढवायची आहे की नाही, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. या घडामोडीनंतर ठाकरे गट आणि काँग्रेसच्या नेत्यांनी महत्त्वाचा निर्णय घेतला असून, यापुढे जागावाटपाच्या बैठकीसाठी शरद पवार गटाच्या नेत्यांना बोलवायचे नाही, असा निर्णय त्यांनी घेतल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

त्यामुळे पुण्यातील मविआतील अंतर्गत तणाव उघडपणे समोर आला असून, या घडामोडींमुळे संपूर्ण राज्याचे लक्ष पुण्याकडे लागले आहे. दरम्यान, महाविकास आघाडीतील घटक पक्षांना उमेदवारांची यादी अंतिम करून एबी फॉर्म देणे आवश्यक असून, उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत जवळ आली आहे. अशा स्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) बैठकीकडे पाठ फिरवत असल्याने संभ्रम अधिक वाढला आहे. ठाकरे गट आणि काँग्रेसची बैठक पुण्यातील काँग्रेस भवन येथे सुरू असून, दोन्ही पक्षांनी राष्ट्रवादीच्या नेत्यांना दोन वेळा बैठकीसाठी निरोप दिला. मात्र प्रतिसाद न मिळाल्याने ठाकरे गटाच्या स्थानिक नेत्यांनी पक्षश्रेष्ठींकडे तक्रार केली. त्यानंतर खासदार संजय राऊत व पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी ‘‘आता कुणाची वाट पाहू नका, उमेदवारी प्रक्रियेत पुढे जा,’’ असे निर्देश दिल्याची माहिती समोर आली.या पार्श्वभूमीवर पुण्यात शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा मविआत सहभाग राहणार की नाही, याबाबत मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तसेच भविष्यात मनसेला महाविकास आघाडीत सहभागी केले जाईल का, याचीही चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.




# मराठी नाट्यप्रयोगाची गिनीज बुकात नोंद; एकाच दिवशी पाच नाटकांचे प्रयोग

## ‘साई पूर्वा आर्टस्’चा जागतिक विक्रम

**पणजी । रयत समाचार**

गोव्यातील साई पूर्वा आर्टस् या संस्थेने आयोजित केलेल्या ‘पंचमवेद’ नाट्ययज्ञ अंतर्गत एका दिवसात पाच वेगवेगळ्या मराठी नाटकांचे प्रयोग सादर करून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्‌समध्ये आपले नाव नोंदविले आहे. या आगळ्यावेगळ्या आणि उल्लेखनीय उपक्रमाची दखल घेत संस्थेला गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्‌सचे अधिकृत प्रमाणपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात आले. या सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित हरियाणा सरकारचे आयुक्त भनीराम मंगेला यांनी बोलताना सांगितले की, सलग एका दिवसात पाच नाट्यप्रयोग सादर करणे हे अत्यंत कठीण कार्य असून, तरीही साई पूर्वा आर्टस् संस्थेच्या कलाकारांनी ते यशस्वीरीत्या पार पाडून प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. विशेषतः भालचंद्र उसगांवकर यांनी पाचही नाटकांमध्ये प्रमुख भूमिका साकारत संपूर्ण नाट्ययज्ञ समर्थपणे पेलला. त्यांच्या उत्कृष्ट पाठांतरशक्ती, आवाजातील चढउतार, भावभावना आणि प्रभावी अभिनयामुळे या उपक्रमाला विशेष उंची प्राप्त झाली आणि त्यामुळेच या संस्थेची गिनीज बुकमध्ये नोंद झाली, असे त्यांनी नमूद केले. या नाट्ययज्ञामध्ये ‘‘संशयकल्लोळ’’, ‘‘जय शिवराय’’, ‘‘कॉल मी कॅप्टन रॉबर्ट’’, ‘‘ययाति आणि देवयानी’’ तसेच ‘‘नटसम्राट’’ या पाच नाटकांचा समावेश होता. यावेळी साई पूर्वा आर्टस् संस्थेच्या वतीने बोलताना भालचंद्र उसगांवकर यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. ग्रामीण नाट्यचळवळ अधिक व्यापक करण्यासाठी ग्रामीण भागात नाट्यविषयक सुविधा उपलब्ध करून देणे, तसेच नवोदित कलाकारांना व्यासपीठ मिळवून देणे हा संस्थेचा प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

# अभय आमचा, मग कुशल नेमका कुणाचा...?

**राजेंद्र देवढे । विशेष प्रतिनिधी**

पाथर्डी तालुक्यातील निंबोडी येथे स्वर्गीय प्रमोद भापसे आयटीआय महाविद्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी, पाथर्डी नगर परिषदेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष अभय आव्हाड यांचा आमचा अभय आव्हाड असा उल्लेख केल्याने व्यासपीठावरील सर्व मान्यवरांचं लक्ष वेधलं गेलं. विखे पाटील हे प्रत्येक शब्दप्रयोग तोलून मापून व हेतुपुरस्सर करतात. त्यामुळे, अभय आव्हाड यांचा उल्लेख करताना त्यांनी आमचा अभय आव्हाड हा शब्दप्रयोग केल्याने त्याचे अनेक अर्थ ध्वनित होतात व ते झालेही. विखे-आव्हाड यांचं दोन पिढ्यांपासून असलेलं राजकीय सख्य पाहता ते होणंही साहजिकच होतं.

माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांचं दक्षिणायन होत असताना, त्यांना अभय आव्हाड यांचं व्यासपीठ उपलब्ध झालं होतं. तेव्हापासून आजतागायत, विखे-आव्हाड हे मेतकूट तितकंच घट्ट आहे. दिवसेंदिवस ते अधिकच खमंगही होत चाललं आहे. त्यातून नवीन समीकरण निर्माण होऊ शकतं, ही जाण राजळे यांच्या ठायी आहे. अहिल्यानगर जिल्हा हा सोधाचा म्हणजेच सोयऱ्या-धायऱ्यांच्या राजकारणाचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. थोरात-राजळे-गडाख-तांबे अशी मातब्बर राजकीय आसामी थोरात लॉबी म्हणून परिचित आहेत. गडाखांचे नातू (कन्येचे सुपुत्र) ॲड. राज देवढे व डॉ. सुजय विखे पाटील यांच्यातील साडूभावाच्या नवनात्यातून, विखे घराण्याचा या नातेसंबंधात चंचुप्रवेश झाला असला तरी विखे-थोरात यांच्यातील राजकीय पीळ मात्र कायम आहे. कारण, ही दोन्हीही अहिल्यानगर जिल्ह्यातील मातब्बर राजकीय घराणी आहेत. काँग्रेसमध्ये एकत्र नांदताना वर्चस्ववादातून त्यांच्यात निर्माण झालेलं राजकीय वैमनस्य हे अजूनही तितकंच तीव्र स्वरुपाचं आहे. विखे पाटील पिता-पुत्र भाजपवासी झाले असले तरी त्याची धार कमी होताना दिसत नाही.

गेल्या लोकसभेच्या निवडणुकीत, सुजय विखे पाटील यांच्या विरोधात निलेश लंके यांच्यासाठी थोरातांची यंत्रणा कार्यान्वित झाल्याने विखे यांना पराभव पत्करावा लागला. हे शल्य अजूनही बोचत असल्याने या दोन्ही घराण्यांतील राजकीय वैमनस्य कायम आहे. गेल्या विधानसभेच्या निवडणुकीत थोरातांना पराभूत करत त्याचा वचपा काढला गेला असला तरी विखे पिता-पुत्रांच्या मनात ही धग कायम आहे. विखे पाटील यांच्या तुलनेत राजळे यांच्या परिवाराचं थोरात यांच्याशी जवळचं नातं आहे. तितकंच गडाख परिवारही थोरांताचा जवळचा



नातेवाईक म्हणून परिचित असून त्यात आता घुले पाटील यांचाही, गडाखांशी नातेसंबंध असल्याने नात्याची ही कक्षा अजूनच रुंदावली आहे. आमदार मोनिका राजळे या भाजपात असून त्या सलग तिसऱ्यांदा विक्रमी मतांनी विजयी झाल्याने त्यांचं भाजपाच्या दरबारातील महत्व वाढीस लागलं आहे. त्यांच्या तुलनेत विखे पिता-पुत्र हे भाजपात नवखे असले तरी ते कानामागून येऊन तिखट झाले आहेत. महाराष्ट्राच्या होऊ घातलेल्या मंत्रीमंडळाच्या विस्तारात, आमदार राजळे यांचं नाव जवळपास निश्चित असणार आहे.

आमदार मोनिका राजळे यांची मंत्रीपदी होणारी निवड ही विखे पिता-पुत्रांना अडचणीची ठरणार आहे. कारण, त्यांना समांतर नेतृत्व निर्माण झाल्याने त्यांच्या चौटाप घोडदौडीला काही प्रमाणात का होईना पण आळा बसणार आहे. त्यामुळे, आमदार राजळे यांना वेळीच निष्प्रभ करण्यासाठी विखे पिता-पुत्रांना उपाययोजना करणं क्रमप्राप्त आहे. याचाच परिपाक म्हणून विखे पिता-पुत्र, आमदार राजळे यांच्या लहानमोठ्या राजकीय प्रतिस्पर्ध्यांना चुचकारत आहेत व अप्रत्यक्ष बळही देत आहेत. पाथर्डी नगर परिषदेच्या निवडणुकीत अभय आव्हाड यांनी थेट जनतेतून मोठा विजय मिळविल्याने त्यांच्या विजयाला वेगळेच आयाम प्राप्त झाले आहेत. त्यांचे वडील स्वर्गीय बाबुजी आव्हाड यांनी पाथर्डी तालुक्याचं १० वर्षे विधानसभेत नेतृत्व केलं होतं. त्यामुळे, त्यांना उपजतच राजकीय वारसा लाभला आहे. तीच परिस्थिती कुशल भापसे यांच्या बाबतीतही आहे. त्यांचे आजोबा स्वर्गीय बाबुराव भापसे हेही विधान परिषदेत का होईना पण आमदार होते. सध्या कुशल भापसे हे हुतात्मा बाबू गेणू समाजवादी विद्यापीठ, या संस्थेचे सचिव असून जिल्हा परिषदेचा दरवाजा खटखटू लागले आहेत. त्यांच्या कार्यक्रमात उपस्थिती नोंदवताना पालकमंत्री विखे पाटील यांनी त्यांच्यावर मुक्तहस्ते स्तुतीसुमने उधळत अभय आव्हाड यांचा उल्लेख आमचा अभय आव्हाड असा केला आहे. मग कुशल नेमका कुणाचा असा प्रश्न पडणंही साहजिकच आहे.

# वेटलिफ्टिंग स्पर्धेत आव्हाड महाविद्यालयाच्या योगिताला सुवर्ण, पूनमला कांस्य पदक

**पाथर्डी । नितीन गटाणी**



तळेगाव दाभाडे येथे पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य युथ, ज्युनियर व सिनियर वेटलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धेत बाबुजी आव्हाड महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन केले. या स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत योगिता खेडकर हिने सिनियर गटात ८६ किलो वजनी गटात ८८ किलो स्नॅच व १०८ किलो क्लीन अँड जर्क असे एकूण १९६ किलो वजन उचलून सुवर्णपदक पटकावले. तसेच युथ गटात पूनम काकडे हिने ६९ किलो वजन गटात ७५ किलो स्नॅच व ९५ किलो क्लीन अँड जर्क असे एकूण १७० किलो वजन उचलत कांस्यपदकाची कमाई केली. या यशाबद्दल पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड, उपाध्यक्ष ॲड. सुरेश आव्हाड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे, अहिल्यानगर डिस्ट्रिक्ट वेटलिफ्टिंग असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. सुभाष देशमुख, उपाध्यक्ष राजेंद्र सोनवणे, तसेच प्रा. संजय धोपावकर यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. या विद्यार्थिनींना अहिल्यानगर डिस्ट्रिक्ट वेटलिफ्टिंग असोसिएशनचे सचिव तसेच महाविद्यालयाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. विजय देशमुख आणि क्रीडा शिक्षक प्रा. सचिन शिरसाट यांचे मार्गदर्शन लाभले.




# आदर्शग्राम येथे २५व्या लोकोत्सवाची जय्यत तयारी

**काणकोण । रयत समाचार**

आदर्शग्राम, आमोणे पैंगीण येथे आदर्श युवा संघाच्या वतीने आयोजित करण्यात येणारा २५ वा लोकोत्सव येत्या ९, १० व ११ जानेवारी २०२६ रोजी मोठ्या उत्साहात साजरा होणार असून, त्याच्या तयारीला वेग आला आहे. या लोकोत्सवासाठी आदर्श युवा संघाचे संस्थापक अध्यक्ष तथा कला व संस्कृती मंत्री डॉ. रमेश तवडकर यांच्या नेतृत्वाखाली १५० हून अधिक कार्यकर्ते कार्यरत आहेत. या रौप्यमहोत्सवी लोकोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणून आदिवासी संस्कृतीवर आधारित भव्य कला दालन उभारण्यात येत असून, त्याचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. यासोबतच विविध स्पर्धांसाठी व्यासपीठ उभारणे, क्रीडा मैदानाची तयारी तसेच आदर्शग्राम परिसर सुशोभित करण्याची कामेही जोमाने सुरू आहेत.

दरम्यान, आदर्श युवा संघाची नुकतीच एक बैठक पार पडली. या बैठकीत आयोजन समितीचे अध्यक्ष तथा मंत्री डॉ. रमेश तवडकर यांच्या उपस्थितीत लोकोत्सवाच्या एकूण नियोजनाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी युवा संघाचे अध्यक्ष चंद्रकांत वेळीप, सचिव दीपक वेळीप, सरपंच सविता तवडकर, सेजल गावकर, पंच अक्षदा वेळीप आदी उपस्थित होत्या. गोमंतकीय ग्रामीण लोकसंस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यासाठी हा लोकोत्सव एक प्रभावी व्यासपीठ ठरत असून, २५ व्या वर्षानिमित्त हा उत्सव अधिक व्यापक आणि आकर्षक स्वरूपात साजरा केला जाणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# अनुयायी, बुकस्टॉल धारकांना सोई-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात- ॲड. गोरक्ष लोखंडे

## विजयस्तंभ अभिवादन सोहळा शांततेत पार पाडण्याचे आवाहन

**पुणे । नितीन गटाणी**



विजयस्तंभास अभिवादनासाठी येणाऱ्या अनुयायी तसेच बुकस्टॉल धारकांना आवश्यक त्या सर्व सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांची विशेष काळजी घेतली जावी, अशा सूचना महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगाचे सदस्य ॲड. गोरक्ष लोखंडे यांनी दिल्या. हवेली तालुक्यातील पेरणे फाटा येथील विजयस्तंभ परिसरास भेट देऊन ता. १ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या विजयस्तंभ अभिवादन सोहळ्याच्या पूर्वतयारीचा त्यांनी आढावा घेतला. यावेळी प्रत्यक्ष स्थळपाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांकडून तयारीबाबत सविस्तर माहिती घेतली. यावेळी समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त विशाल लोंढे, बार्टीचे विभागप्रमुख डॉ. बबन जोगदंड, लोणीकंद पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सर्जेराव कुंभार तसेच स्थानिक पदाधिकारी व अनुयायी उपस्थित होते. या पाहणीदरम्यान विजयस्तंभ सजावट, रुग्णवाहिका व्यवस्था, आरोग्य केंद्र, स्वच्छता, पिण्याच्या पाण्याचे टँकर, हिरकणी कक्ष, बसेसचे नियोजन, पुस्तक विक्री स्टॉल, शौचालये, वाहनतळ, रस्ते दुरुस्ती, कायदा व सुव्यवस्था, वाहतूक नियोजन, गर्दी नियंत्रण, पोलीस बंदोबस्त, सीसीटीव्ही, नियंत्रण कक्ष व आवश्यक मनुष्यबळ याबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी बोलताना ॲड. गोरक्ष लोखंडे म्हणाले की, विजयस्तंभ परिसर ही क्रांतिकारी भूमी असून देशाच्या विविध भागांतून अनुयायी येथे अभिवादनासाठी येतात. या अनुयायांना आवश्यक त्या सुविधा देण्यासाठी प्रशासन, सामाजिक संस्था व नागरिक जबाबदारीने काम करत आहेत. बार्टी व समाजकल्याण विभागामार्फत सुमारे १५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. विजयस्तंभ परिसरात एलईडी स्क्रीनद्वारे संविधानाविषयी माहिती देणाऱ्या चित्रफिती दाखवाव्यात. महिलांसाठी उभारण्यात येणाऱ्या शौचालये व हिरकणी कक्षामध्ये सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. तसेच बुकस्टॉल धारकांना जागा, वीज, पाणी, चटई, जेवण, अल्पोपहार, टेबल आदी सुविधा देण्याबरोबरच हिवाळा लक्षात घेऊन निवारा कक्षाची व्यवस्था करण्यात यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. यावर्षी अपेक्षित मोठ्या गर्दीचा विचार करून प्रशासनाने केलेल्या पूर्वतयारीबाबत समाधान व्यक्त करत, प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून अनुयायांनी शांततेत व शिस्तबद्ध पद्धतीने सहकार्य करावे, असे आवाहनही ॲड. लोखंडे यांनी केले.




# लोकशाही उत्सव

## अहिल्यानगर महानगरपालिका निवडणूक - २०२५-२६




## माझी भुमिका, आपले प्रगतीपुस्तक



आपल्या प्रभागाची व्याप्ती मोठी असून कॉटेज कॉर्नर ते सुडके मळा असा विविध भौगोलिक परिस्थितीचा भाग आहे. या भागात आणखीही खुप विकासकामांची गरज आहे. आजही अनेक कॉलन्यांमधे पिण्याचे पाणी, स्वच्छता व लाईटची बोंब आहे. लोकांना संपुर्ण पाणीपट्टी भरून ३६५ दिवसांपैकी १५० दिवससुध्दा निट पाणी मिळत नाही. ही फार मोठी शोकांतिका आहे. अहिल्यानगर महानगरपालिकेतील सर्वात जास्त आदिवासी बांधव या प्रभागात आहेत. मनपा स्थापनेपासून त्यांचे काहीच प्रश्न सुटले नाहीत. आत्तापर्यंतचे आदिवासी नगरसेवक बाहेरचेच होते. त्यांनी आदिवासी लोकांच्या नागरि सुविधेवर १० पैसेसुध्दा खर्च केलेले नाहीत. मी नगरसेवक झाल्यावर सर्वात आधी त्यांच्या बोगस खर्चाचे ऑडिट करण्यास लाविन.

मी जरी नविन उमेदवार असलो तरी प्रभागातील सिनिअर माजी नगरसेवक अर्जूनतात्या बोरूडे, प्रथम विरोधीपक्षनेते भैरवनाथ वाकळे, माजी नगरसेवक हनुमान भुतकर, रविंद्र बारस्कर यांचे मार्गदर्शन घेऊन आपला प्रभाग आदर्श करीन.

सर्वात महत्वाचे म्हणजे काही दिवसांपुर्वी माजी नगरसेवकांच्या दूर्लक्षामुळे मनपाने महिलांचा पिण्याचा पाण्याचा गंभीर प्रश्न असलेली पाणीपट्टी जवळजवळ दुप्पट वाढविलेली आहे. निवडून गेल्यावर आधी ती रद्द करण्याचा ठराव करायला भाग पाडेन. तसेच पद्मावती पेट्रोलपंपामागे मनपाची अंदाजे १७ गुंठे ओपनस्पेस आहे. त्याच्यावर छत्रपती संभाजी महाराज आयुर्वेद निसर्गोद्यान ठराव करून लोकसहभागातून भारी उद्याननिर्मिती करीन. हीच छत्रपती संभाजी महाराजांना खरी आदरांजली असेल. मी जरी एका प्रभागाचा प्रतिनिधी असलो तरी आदिवासींसह सर्व लोकसमुहांचे प्रश्न सोडवून त्यांना आनंदी करीन.

**प्रभाग क्र. ७**
**धनंजय पोपट गोलवड,**
**संपर्क : ९५५२२९८०३१**

# मतदारांची अस्वस्थ भावना

## अर्थकेंद्री निवडणुकांमुळे लोकशाहीला 'अर्थ'च उरला नाही

भारतीय लोकशाही अमृतमहोत्सव साजरा करत असताना, "जगातील सर्वात मोठी लोकशाही" हा गौरव नेमका कितपत वास्तवदर्शी आहे, हा प्रश्न आज प्रत्येक सजग नागरिकाच्या मनात घोळत आहे. लोकशाहीची व्याख्या केवळ निवडणुका घेण्यापुरती मर्यादित असेल, तर भारत नक्कीच आघाडीवर आहे. मात्र लोकशाहीचा आत्मा असलेली नैतिकता, प्रामाणिक प्रतिनिधित्व आणि जनहित ही मूल्ये आज पैशाच्या ढिगाऱ्याखाली गाडली गेली आहेत. आज लोकशाहीचे स्वरूप "जनतेचे, जनतेसाठी आणि जनतेद्वारे शासन" न राहता पैसा, दहशत आणि घराणेशाही यांच्या ताब्यात गेलेली व्यवस्था बनत चालली आहे.

**१) निवडणूक : 'सेवा' नव्हे, तर 'हाय-रिटर्न बिझनेस' :** आज ग्रामपंचायत सदस्यापासून आमदारखासदारांपर्यंत उमेदवार "पात्र" ठरण्याचा एकमेव निकष म्हणजे त्याची आर्थिक ताकद ठरत आहे. पूर्वी नागरिक वर्गणी गोळा करून उमेदवार निवडून आणत; आज उमेदवार मतदारांना 'वर्गणी' म्हणजेच पाकिटे वाटून स्वतःला निवडून आणतो. जो जास्त पैसा खर्च करू शकतो, जो थेट प्रलोभने देऊ शकतो, जो सुशिक्षित व पैसे न घेणाऱ्या मतदारांना सोसायटीतील पेव्हर ब्लॉक, इमारतींचे रंगकाम, रस्ते, लाईट यांची आश्वासने देतो, जो तरुणांना दारू, मटणाच्या पार्ट्यांत गुंतवतो तोच "निवडणूक जिंकण्यास सक्षम" उमेदवार मानला जातो. आज राजकारण स्पष्टपणे हाय-रिटर्न बिझनेस झाले आहे. निवडणुकीत २३ कोटी खर्च करून पुढील पाच वर्षांत त्याचा शंभरपट, हजारपट परतावा मिळतो. दुचाकीवर फिरणारा उमेदवार काही वर्षांत फॉर्च्युनरमध्ये फिरतो, फार्महाऊस उभारतो आणि पगारी कार्यकर्त्यांचे सैन्य पोसतो. जेव्हा उमेदवारीची पात्रता बँक बॅलन्सवर ठरते, तेव्हा धोरणे जनतेसाठी नसून धनदांडग्यांच्या फायद्यासाठी तयार होतात. ही लोकशाही नसून थेट धनशाही (Plutocracy) आहे.

**२) दहशत आणि घराणेशाहीचे अभेद्य कवच :** आर्थिक ताकदीसोबतच उमेदवाराची स्थानिक दहशत ही देखील पात्रतेची अट ठरत आहे. गावगुंड, दबावतंत्र, "साम, दाम, दंड, भेद" नीती आणि घराणेशाहीचा वारसा यांच्या जोरावर राजकारण चालवले जाते. अशा उमेदवारांना राजकीय पक्षांचेही पूर्ण संरक्षण मिळते, कारण पक्षांना जनसेवक नको असतो, तर निवडून येण्याची क्षमता (Electability) असलेला उमेदवार हवा असतो. या पार्श्वभूमीवर प्रामाणिक, निष्ठावान, समाजासाठी झटणाऱ्या कार्यकर्त्यांना राजकारणात स्थान मिळत नाही. पैसा नाही, दहशत नाही आणि भ्रष्ट यंत्रणेशी तडजोड करण्याची तयारी नाही म्हणून ते "अपात्र" ठरतात.



**सुधीर लक्ष्मीकांत दाणी**
नवी मुंबई
९८६९२२६२७२

**३) मतदारांपुढील यक्षप्रश्न : निवडायचे कोणाला? :** विचारवंत आणि सामाजिक संस्था वारंवार आवाहन करतात "पात्र उमेदवार निवडा." मात्र वास्तव असे आहे की मतदारासमोर कोणीच पात्र उमेदवार उरत नाही. म्हणून मतदार अनेक अपात्र उमेदवारांपैकी "कमी अपात्र" उमेदवार निवडतो किंवा मतदानालाच पाठ फिरवतो. इतिहास साक्षी आहे की निवडून आलेले बहुतेक प्रतिनिधी जनहितापेक्षा स्वतःच्या हितालाच प्राधान्य देतात. प्रत्येक निवडणुकीनंतर मतदारांचा विश्वासघात होतो आणि परिणामी निवडणुकांबाबत तिरस्कार, वितृष्णा व अविश्वास वाढत जातो. कोणताही पक्ष याला अपवाद नाही. त्यामुळे आजची लोकशाही वास्तवात आभासी लोकशाही बनली आहे.

**४) भ्रष्टाचाराचे 'महाकेंद्र' आणि गायब झालेली पारदर्शकता :** जनसेवेच्या नावाखाली सुरू असलेली लूट धक्कादायक आहे. महाराष्ट्रातील सुमारे २८,५०० ग्रामपंचायतींपैकी फारच थोड्या अपवाद वगळता स्थिती भयावह आहे. अगदी कमी लोकसंख्येच्या गावालाही दरवर्षी ३०४० लाख रुपयांचा निधी मिळतो; मात्र त्यातील किमान २० टक्के रक्कमही प्रत्यक्ष विकासावर खर्च होत नाही. महानगरपालिका तर लुटीची "महाकेंद्रे" बनली आहेत. जर कारभार खरोखर पारदर्शक असेल, तर आजच्या डिजिटल युगात प्रत्येक ग्रामपंचायतीचा, प्रत्येक रुपयाचा हिशेब नागरिकांसमोर का मांडला जात नाही? लपवण्यासारखे काही नसताना ही गुप्तता का?. संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा भ्रष्टाचाराला पोषक बनल्यामुळेच स्थानिक स्वराज्य संस्था ताब्यात घेण्यासाठी युतीआघाड्या होतात, हे आज लहान मुलालाही माहीत आहे.

**५) मतदारांची 'मन की बात' :** कटू असले तरी सत्य हेच आहे की प्रत्येक मतदाराच्या मनात आज एकच भावना आहे "अर्थकेंद्री निवडणुकांमुळे लोकशाहीला अर्थच उरलेला नाही." निवडणुका आता लोकशाहीचा उत्सव न राहता लोकशाहीचा तमाशा बनल्या आहेत. दुर्दैवाने, मतदारांची 'मन की बात' ऐकण्याऐवजी नेत्यांना स्वतःचीच 'मन की बात' ऐकवण्यात अधिक रस आहे. त्यामुळे सामान्य नागरिकांची अस्वस्थता निवडणुकांच्या कोलाहलात गाडली जाते. लोकशाहीवर प्रेम असूनही, अत्यंत खिन्न मनाने असे म्हणावे लागते की जर सरकार व निवडणूक आयोग खऱ्या अर्थाने निवडणुका लोकशाहीपूरक करण्यास असमर्थ असतील, तर सरळपणे निवडणुका बंद करून संबंधित पदांचा "पाच वर्षांसाठी लिलाव" करावा, हीच मतदारांची शेवटची इच्छा उरते.

**मतदारांसाठी आत्मचिंतनाची वेळ :**

लोकशाही वाचवायची असेल, तर केवळ मतदान करून भागणार नाही. जोपर्यंत निवडणुकांतील काळा पैसा, दहशत आणि घराणेशाही संपत नाही, तोपर्यंत सामान्य माणसाचा आवाज सत्तेपर्यंत पोहोचणार नाही. लोकशाहीत निवडून येणारा प्रतिनिधी हा त्या समाजाची पात्रता किंबहुना लायकी दर्शवत असतो, हे कटू वास्तव स्वीकारून मतदारांनी आत्मचिंतन करण्याची वेळ आली आहे आणि ती वेळ झपाट्याने निघून चालली आहे.

*(लेखक सामाजिक विषयांचे अभ्यासक आहेत) रयत समाचार*

# मतदारांनो, तुमचे नाव यादीत आहे का? आत्ताच तपासा!

## अहिल्यानगर महानगरपालिका निवडणूक २०२५-२६

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर मतदारांसाठी महत्त्वाची माहिती. प्रत्येक पात्र नागरिकाने मतदानाचा हक्क बजावण्यासाठी आपले नाव मतदारयादीत आहे की नाही, याची खात्री करून घेणे आवश्यक आहे. मतदारांना आपले नाव ऑनलाइन पद्धतीने सहज शोधता येणार असून त्यासाठी खालील सोपी प्रक्रिया उपलब्ध करून देण्यात आली आहे.

असे शोधा मतदार यादीत आपले नाव


https://mahasecvoterlist.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्या, होमपेजवरील "Search Name in Voter List" या पर्यायावर क्लिक करा. ३ तुम्ही खालील दोनपैकी कोणत्याही पद्धतीने शोध घेऊ शकता. Name Wise (नावानुसार शोध)- EPIC Number Wise (मतदार ओळखपत्र क्रमांकानुसार शोध), त्यानंतर पुढील माहिती भरा स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रकार जिल्हा विधानसभा मतदारसंघ महानगरपालिकेचे नाव मतदाराचे संपूर्ण नाव, सर्व माहिती भरल्यानंतर तुम्हाला तुमचे नाव कोणत्या प्रभागात नोंदणीकृत आहे, याची सविस्तर माहिती मिळेल. अहिल्यानगर महानगरपालिकेच्या अधिकृत कामकाजाबाबत माहिती मिळवण्यासाठी http://amc.gov.in या संकेतस्थळाला भेट देता येईल. मतदारांनो, मतदानाचा हक्क हा लोकशाहीचा पाया आहे. निवडणुकीपूर्वी आपले नाव मतदार यादीत आहे की नाही, याची खात्री करून घ्या आणि मतदानासाठी सज्ज राहा.

# निवडणुक खर्चावर अधिकाऱ्यांचा वॉच; दरपत्रक जाहीर

**अहमदनगर । रयत समाचार**

महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर तयारीला वेग आला असून, उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. या पार्श्वभूमीवर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी उमेदवारांच्या प्रचार खर्चासाठी लागणाऱ्या खानपान व इतर साहित्याचे दर अधिकृतपणे जाहीर केले आहेत.

त्यानुसार शाकाहारी जेवणाचे दर ११५ ते १८० रुपये, मटण प्लेट २४० रुपये तर बिर्याणीची प्लेट १५० रुपये निश्चित करण्यात आली आहे. लोकसभा व विधानसभा निवडणुकांनंतर वाढलेल्या दरांचा परिणाम महापालिका निवडणुकीतील खर्चावरही दिसून येत असून, या दरांमुळे उमेदवारांच्या खर्चाचे नियोजन अधिक काटेकोरपणे करावे लागणार आहे. महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रशासनाने सर्व तयारी पूर्ण केली आहे. ३० डिसेंबर ही उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख असून, त्या पार्श्वभूमीवर उमेदवारांना खर्च मर्यादेच्या अनुषंगाने अधिकृत दरपत्रक देण्यात आले आहे. या दरपत्रकात सुई-दोऱ्यापासून ते मंडप, ध्वज, बॅनर, प्रचार साहित्य, खानपान आदी सर्व बाबींचा समावेश करण्यात आला आहे.




निवडणूक खर्चासाठी चहा, पाणी, खुर्ची, टेबल, शाकाहारी व मांसाहारी जेवण, बिर्याणी, डोसा, फलक, बॅरिकेडिंग, फुलांचे हार अशा अनेक बाबींचे दर निश्चित करण्यात आले असून उमेदवारांना याच दरांनुसार खर्च दाखवावा लागणार आहे. उमेदवारांना मंडप उभारण्यासाठी प्रतिचौरस फूट १५ रुपये दर निश्चित करण्यात आला आहे. टेबलसाठी ३० रुपये, तर खुर्चीसाठी १० रुपये आकारण्यात येणार आहेत. नेत्यांच्यास्वागतासाठी उभारण्यात येणाऱ्या कमानींसाठी ४ हजार ते ८ हजार रुपये दर ठेवण्यात आला आहे. महापालिकेच्या मैदानांवर सभा घेण्यासाठीही स्वतंत्र दर निश्चित करण्यात आले आहेत. सावेडी उपनगरातील जॉगिंग पार्क मैदान एका दिवसासाठी १० हजार रुपये दराने उपलब्ध राहणार आहे. गांधी मैदानासाठी विना स्टेज ३,१३९ रुपये, तर स्टेजसह १५,६४६ रुपये दर निश्चित करण्यात आला आहे. खासगी मंगल कार्यालय वापरण्यासाठी प्रतिदिन सुमारे ५० हजार रुपये खर्च अपेक्षित आहे. महापालिका निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी आणि उमेदवारांच्या खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी हे दर निश्चित करण्यात आले असून, उमेदवारांना याच दरांनुसार खर्च दाखवणे बंधनकारक राहणार आहे.

# प्रभाग ५ मधील मतदारांचा गोंधळ मिटला

## हरकतीची मनपा आयुक्तांकडून दखल

**अहमदनगर । रयत समाचार**

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्र. ५ मधील रामवाडी झोपडपट्टी परिसरातील सुमारे ९०० ते १००० मतदारांची नावे चुकून प्रभाग क्र. १० च्या मतदार यादीत समाविष्ट झाल्याचा गंभीर प्रकार समोर आला होता. या संदर्भात रामवाडी परिसरातील नागरिकांच्या वतीने प्रकाश वाघमारे, सागर साठे व विकास उडाणशिवे यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे लेखी हरकत नोंदवली होती. ता. २० नोव्हेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या मूळ प्रारूप मतदार यादीत यादी भाग क्र. १२२ मधील अनुक्रमांक १३७५७ ते १४७५६ पर्यंतचे सर्व मतदार प्रभाग क्र. ५ मध्ये योग्यरीत्या समाविष्ट होते. मात्र ता. १५ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या अंतिम मतदार यादीत याच यादी भागातील मतदारांची नावे चुकून प्रभाग क्र. १० मध्ये दाखवण्यात आली होती. त्यामुळे रामवाडी परिसरातील नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर संभ्रम निर्माण झाला होता. हा प्रकार महापालिका आयुक्त तसेच निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आल्यानंतर त्यांनी तात्काळ त्याची दखल घेतली. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या ता. २ जानेवारी २००२ च्या आदेशानुसार नामनिर्देशन पत्र भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत अशा स्वरूपाच्या त्रुटी दुरुस्त करता येतात. त्यानुसार संबंधित मतदार यादीची सखोल तपासणी करण्यात आली. तपासणीत असे स्पष्ट झाले की, यादी भाग क्र. १२२ हा प्रभाग क्र. ५ व प्रभाग क्र. १० यांच्या सीमेलगत असला, तरी रामवाडी व सर्जेपुरा परिसरातील सर्व मतदार प्रभाग क्र. ५ मध्येच समाविष्ट होणे आवश्यक आहे. त्यामुळे चुकून प्रभाग क्र. १० मध्ये टाकण्यात आलेली सर्व नावे पुन्हा प्रभाग क्र. ५ मध्ये वर्ग करण्यात आली आहेत. या दुरुस्तीची अधिकृत नोंद घेऊन महापालिकेच्या वतीने पुरवणी मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली असून, ही यादी महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे संबंधित मतदारांचा मतदानाचा हक्क अबाधित राहिला असून नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# भारताचा क्रांतिकारी कामगार पक्ष मैदानात

## कॉम्रेड अविनाश साठे यांच्या उमेदवारीसाठी भव्य प्रचारफेरी

**अहमदनगर । आबीद खान**

भारताचा क्रांतिकारी कामगार पक्षाच्या वतीने उमेदवार कॉम्रेड अविनाश साठे यांच्या उमेदवारीच्या घोषणेनिमित्त गवळीवाडा, सिद्धार्थनगर, म्युनिसिपल कॉलनी व बौद्धवस्ती परिसरातून भव्य प्रचारफेरी काढण्यात आली. प्रचारफेरीची सुरुवात गवळीवाडा येथून करण्यात आली. जोरदार घोषणाबाजी व कॉम्रेड अविनाश साठे यांच्या प्रभावी भाषणामुळे रॅलीला उत्स्फूर्त वातावरण लाभले. परिसरातील कामगार, कष्टकरी व नागरिक मोठ्या संख्येने या प्रचारफेरीत सहभागी झाले होते. यावेळी बोलताना कॉम्रेड अविनाश साठे म्हणाले की, आरडब्ल्यूपीआयच्या नेतृत्वाखाली जनतेच्या पाठबळावर ३५ वर्षांपासून प्रलंबित असलेला पाणीप्रश्न सोडवण्यात आला, डीपी मंजूर करण्यात आली, ड्रेनेज लाईनचे काम व अंशतः कॉंक्रिटीकरण झाले,




तसेच शेकडो विद्यार्थ्यांचे शालेय प्रवेश करून देण्यात आले. या ठोस जनकार्यांच्या बळावरच आपण ही निवडणूक जनतेच्या पाठिंब्याने लढवत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या महानगरपालिका निवडणुकीत भारताचा क्रांतिकारी कामगार पक्ष हा कामगार-कष्टकऱ्यांचा स्वतंत्र राजकीय पर्याय म्हणून मैदानात उतरला असल्याचे त्यांनी सांगितले. आतापर्यंत कामगार-कष्टकरी जनतेने पर्याय नसल्यामुळे विविध भांडवली पक्षांवर विश्वास ठेवला; मात्र त्यांच्या सत्ताकाळात सामान्य जनतेच्या जीवनात कोणताही मूलभूत बदल घडून आलेला नाही. भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, मनसे तसेच वंचित बहुजन आघाडी हे सर्व पक्ष भांडवलदार वर्गाच्या वेगवेगळ्या घटकांचे प्रतिनिधित्व करतात आणि त्यामुळे सत्ता कुणाच्याही हाती असली तरी धोरणे ही भांडवलदारांच्या हिताचीच राहतात, असा आरोप त्यांनी केला. कामगारांनी या भांडवली पक्षांचे वर्गस्वरूप ओळखून कामगार-कष्टकऱ्यांची मजबूत वर्गीय एकजूट उभी करावी व भांडवली राजकारण नाकारावे, असे आवाहनही त्यांनी केले. जनतेच्या सहमतीने व पाठिंब्यानेच आपण निवडणूक रिंगणात उतरल्याचे सांगून, कामगार-कष्टकऱ्यांचे पर्यायी, जनहिताचे आणि क्रांतिकारी राजकारण उभे करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. या प्रचारफेरीत मोठ्या संख्येने कामगार-कष्टकरी सहभागी झाले होते. रॅलीचा समारोप पंचशील शाळेजवळ करण्यात आला.

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com **(वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)**

# सुपरस्टार राजेश खन्ना

हिंदी चित्रपट सृष्टीतील पहिले सुपरस्टार म्हणून ओळखले जाणारे जेष्ठ अभिनेते राजेश खन्ना यांची आज जयंती. राजेश खन्ना यांचा जन्म २९ डिसेंबर १९४२ रोजी पंजाबमधील अमृतसर येथे झाला. राजेश खन्ना यांचे मूळ नाव जतीन खन्ना असे होते. त्यांच्या आईचे नाव चंद्राणी खन्ना तर वडिलांचे नाव लाला हिराणी असे होते. त्यांचे वडील शाळेत मुख्याध्यापक होते. त्यांच्या एका जवळच्या नातेवाईकांना मुलबाळ नव्हते म्हणून त्यांच्या आई वडिलांनी त्यांना त्या नातेवाईकांकडे दत्तक दिले. त्यांच्या नवीन आईचे नाव लीलावती खन्ना तर वडिलांचे नाव चुनीलाल खन्ना असे होते. चुनीलाल खन्ना रेल्वे कंत्राटदार होते. ते मुंबईत राहत होते. राजेश खन्ना हे सेंट सबिस्टाईन गॉन हायस्कूल येथे शिकत असताना त्यांची रवी कपूर यांच्याशी ओळख झाली. रवी कपूर म्हणजेच हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते जितेंद्र. राजेश खन्ना व जितेंद्र यांनी कॉलेज जीवनात अनेक नाटकात एकत्र काम केले. नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी राजेश खन्ना हे पुण्यात आले. पुण्यात दोन वर्ष शिक्षण घेतल्यावर ते पुन्हा मुंबईला परतले. मुंबईत काही दिग्दर्शकांनी टॅलेंट हंट स्पर्धा आयोजित केली. राजेश खन्ना यांच्या काकांनी त्यांचे नाव या स्पर्धेकरिता नोंदवले. ते नोंदवताना त्यांनी त्यांचे नाव जतीन खन्ना ऐवजी राजेश खन्ना म्हणून नोंदवले पुढे याच नावाने ते ओळखले जाऊ लागले. या स्पर्धेत त्यांनी पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक मिळवले. त्यांच्या अभिनयाने त्याकाळातील दिग्गज दिग्दर्शक प्रभावित झाले. १९६६ साली चेतन आनंद यांनी त्यांना आखरी खत या चित्रपटात संधी दिली हाच त्यांचा पहिला चित्रपट. हा चित्रपट ऑस्करला गेला होता. पहिल्याच चित्रपटातील त्यांच्या अभिनयाने चित्रपट रसिक तसेच जाणकार प्रभावित झाले त्यामुळे त्यांना अनेक चित्रपट मिळाले. त्याकाळातील यशस्वी दिग्दर्शक असणारे शक्ती सामंत यांनी त्यांना आराधना या चित्रपटात नायकाची भूमिका दिली. या चित्रपटात शर्मिला टागोर या त्यांच्या नायिका होत्या. चित्रपट सुपरहिट झाला. या चित्रपटातील सर्व गाणी लोकप्रिय झाली. या चित्रपटा नंतरच राजेश खन्ना सुपरस्टार म्हणून ओळखले जाऊ लागले. राजेश खन्ना यांची अदाकारी, संवाद फेकीची लकब यावर तरुणाई फिदा झाली. विशेषतः कॉलेज मधील मुली त्यांच्यावर जीव ओवाळून टाकू लागल्या. त्यांचे चाहते त्यांच्या गाडीचे चुंबन घ्यायचे. मुली त्यांच्या गाडीची धूळ आपल्या भांगेत भरत. बऱ्याचश्या मुलींनी त्यांच्या फोटोशी लग्न केले होते. त्यांना चाहत्यांचे जितके प्रेम लाभले तितके प्रेम कोणत्याच कलाकाराला लाभले नाही. राजेश खन्ना यांचे सलग १५ चित्रपट सुपरहिट झाले हा एक विक्रम आहे. तो अजूनही कोणत्या अभिनेत्याला तोडता आला नाही. शर्मिला टागोर, मुमताज, आशा पारेख, तनुजा यांच्याशी त्यांची चांगली केमिस्ट्री जमली. सत्तरच्या दशकात राजेश खन्ना सुपरस्टार पदावर आरूढ झाले होते. चालण्या बोलण्याची विशिष्ट ढब, मानेला खास झटका देत, हातवारे करत नाचण्याची अनोखी शैली, जबरदस्त संवाद फेक आणि ओठावर रुंजी घालतील अशी गाणी यामुळे राजेश खन्ना हे अफलातून रसायन बनून गेले. त्याकाळात सर्वाधिक मानधन घेणारे राजेश खन्ना यांची प्रेम प्रकरणेही गाजली पण १९७३ साली त्यांनी आपल्या पेक्षा कितीतरी लहान वयाच्या डिंपल कपाडिया यांच्याशी विवाह केला. १९९२ साली काँग्रेसच्या वतीने त्यांनी दिल्ली मतदार संघातून लोकसभेची पोटनिवडणुक लढवली आणि ते खासदार म्हणून निवडून आले. १८ जुलै २०१२ रोजी राजेश खन्ना यांनी चाहत्यांना अलविदा म्हणत जगाचा निरोप घेतला आणि बॉलिवूडचा पहिला सुपरस्टार काळाच्या पडद्याआड गेला. ''बाबूमोशाय....... बाबू मोशाय जिंदगी और मौत उपरवाले के हात है जहाँपणा.... जिसे ना तो आप बदल सकते है ना मै.... हम सब तो रंगमंच की कटपुतलीया है, जीसकी डोर उपरवालेकी उंगलीओमे बंधी है....कब कोण कैसे उठेगा कोई बता नहीं सकता.....'' आनंद कभी मरते नहीं वह हमेशा याद रहते है.... राजेश खन्ना यांना विनम्र अभिवादन!



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद



# आईच्या घामातून जन्मलेलं स्वप्न आज प्रत्यक्षात उतरलं– उजमा शेख

## सर्वसामान्य कुटुंबातील मुलगी झाली पोलीस उपनिरीक्षक

**अहमदनगर | समीर मन्यार**

घरची अत्यंत हालाखीची परिस्थिती, अंगणवाडीत भात शिजवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारी आई आणि त्या कष्टांच्या बळावर उभं राहिलेलं स्वप्न अशी संघर्षमय वाटचाल करत आष्टी येथील उजमा सायरा सलीम शेख हिने पोलीस उपनिरीक्षक होण्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरवले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळवून पोलीस उपनिरीक्षक पदाचे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांची पुणे येथे नियुक्ती झाली. या उल्लेखनीय यशाबद्दल पुणे येथे सेवेसाठी रवाना होत असताना अहिल्यानगर येथे माजी सैनिक युनूस टेंगे कुटुंबीयांच्या वतीने उजमा शेख यांचा गौरवपूर्ण सन्मान करण्यात आला. हा सन्मान नेहा टेंगे यांच्या हस्ते करण्यात आला.


यावेळी तबस्सुम सय्यद, डॉ. अर्चना नागरे, कर्नल बोरुडे, बाळासाहेब आंधळे, सुभेदार हरिभाऊ चिरके, पटेल शेखबहादूर, साजिद हवलदार, अकबर शेख, मुस्तफा शेख, अब्दुल वारिसमुल्ला, असलम पठाण, शांतीलाल पवार, सतीश घुमरे, तुकाराम जाधव यांच्यासह माजी सैनिक संघटनेचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना उजमा शेख म्हणाल्या की, ''मी एका सर्वसामान्य कुटुंबातील मुलगी आहे. माझ्या आईने काबाडकष्ट करून मला शिकवलं. जिल्हा परिषद शाळेतून माझ्या शिक्षणाची सुरुवात झाली. शिक्षणासोबत जिद्द, चिकाटी आणि कुटुंबाचं पाठबळ असेल तर सामान्य घरातील मुलंही मोठी स्वप्नं पूर्ण करू शकतात, हे मी स्वतः अनुभवले. गरीबी म्हणजे काय आणि परिस्थितीशी संघर्ष कसा करावा लागतो, हे मी जवळून पाहिलं. आईच्या घामातून जन्मलेलं स्वप्न आज प्रत्यक्षात उतरलं. माजी सैनिक कुटुंबीयांच्या वतीने मिळालेला हा सन्मान मला अधिक जबाबदारीची जाणीव करून देणारा आहे. पोलीस अधिकारी म्हणून काम करताना तळागाळातील लोकांना न्याय देणे, शिक्षणापासून वंचित राहिलेल्या घटकांना मुख्य प्रवाहात आणणे आणि समाजासाठी प्रामाणिकपणे सेवा करणे हेच माझे ध्येय राहील.''

यावेळी युनूस टेंगे यांनी सांगितले की, उजमा शेख यांच्या यशामागे त्यांच्या आई सायरा सलीम शेख यांचे अपार कष्ट आहेत. आष्टी येथील जिल्हा परिषद कन्या शाळेत त्या अनेक वर्षांपासून विद्यार्थिनींसाठी भात शिजवण्याचे काम करतात. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी मुलीला शिक्षणापासून कधीच वंचित ठेवले नाही. आईच्या कष्टांची जाणीव ठेवून उजमाने हे यश संपादन केले असून, हे यश केवळ वैयक्तिक नसून ग्रामीण भागातील असंख्य मुली व कष्टकरी कुटुंबांसाठी प्रेरणादायी आहे. अशा मुलींना पाठबळ देणे हे समाजाचे कर्तव्य असल्याचे त्यांनी नमूद केले.

# सकाळचा खोकला म्हणजे धोक्याची घंटा

## 'स्मोकर्स कफ'कडे दुर्लक्ष नकोच

आरोग्यवार्ता | रयत समाचार




'खोकला' ही किरकोळ तक्रार समजून अनेकजण दुर्लक्ष करतात. थंडी, प्रदूषण किंवा साधी ॲलर्जी असेल, असे गृहित धरले जाते. मात्र सकाळच्या वेळी होणारा जड, कफयुक्त खोकला हा शरीराने दिलेला गंभीर इशारा असू शकतो, याकडे तज्ज्ञ लक्ष वेधत आहेत. अलीकडेच एका तरुण मुलाच्या तपासणीदरम्यान हा प्रकार स्पष्ट झाला. खोकल्याच्या तक्रारीसाठी तो आधीच अनेक डॉक्टरांकडे जाऊन कफ सिरप घेऊन झाला होता. तरीही खोकला काही केल्या जात नव्हता. तपासणीदरम्यान छातीतून येणारा जड, जुन्या डिझेल इंजिनसारखा आवाज, दीर्घ वेळ खाकरल्यानंतरच निघणारा कफ आणि सकाळीच वाढणारा त्रास, या सर्व लक्षणांनी खरी समस्या उघड केली. फुफ्फुसातील 'सिलिया' आणि स्मोकर्स कफ : आपल्या फुफ्फुसांमध्ये 'सिलिया' नावाच्या सूक्ष्म झाडूसारख्या पेशी असतात. घरात रोज झाडू मारून कचरा बाहेर काढला जातो, तसेच सिलिया फुफ्फुसातील धूळ, कचरा व विषारी घटक बाहेर टाकण्याचे काम करतात. मात्र धूम्रपानामुळे या सिलियांना अडथळा निर्माण होतो. त्या काही काळ निष्क्रिय (जणू कोमामध्ये) जातात. परिणामी कचरा आत साचत राहतो. रात्री धूम्रपान थांबलेले असताना या सिलिया पुन्हा कार्यरत होतात. रात्रभर साचलेला कचरा गळ्याकडे ढकलला जातो आणि सकाळी उठल्यावर तो बाहेर टाकण्यासाठी फुफ्फुसे जोरात ''बंड'' करतात. यालाच 'स्मोकर्स कफ' म्हणतात.

**धोक्याची लक्षणे ओळखा–** सकाळीच वाढणारा जड खोकला खाकरल्याशिवाय घसा साफ न होणे. कफ पांढरा असल्यास तुलनेने कमी धोका, पण पिवळा किंवा हिरवा कफ असल्यास संसर्गाचे लक्षण. दीर्घकाळ धूम्रपान केल्यास सिलिया कायमचे नष्ट होण्याचा धोका.

**दुर्लक्ष केल्यास गंभीर परिणाम –** जर हा कचरा नियमितपणे बाहेर पडला नाही, तर फुफ्फुसातील हवेच्या पिशव्या (एअर सॅक्स) हळूहळू खराब होतात. पुढे जाऊन म्हणजेच क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीजसारखा गंभीर, दीर्घकालीन आजार होऊ शकतो. धूम्रपान बंद केल्यावर खोकला वाढतोय? घाबरू नका. धूम्रपान पूर्णपणे बंद केल्यानंतर सुरुवातीच्या काही दिवसांत खोकला उलट वाढू शकतो. मात्र हे घाबरण्याचे कारण नाही. याचा अर्थ फुफ्फुसातील सिलिया पुन्हा पूर्ण ताकदीने कामाला लागल्या असून जुना साचलेला कचरा साफ करत आहेत.

सकाळचा खोकला ही साधी तक्रार नाही, तर शरीराची 'वॉर्निंग बेल' आहे. वेळेत इशारा ओळखून धूम्रपान थांबवणे, तपासणी करून घेणे आणि योग्य उपचार करणे अत्यावश्यक आहे. अन्यथा हा किरकोळ वाटणारा खोकला भविष्यात गंभीर आजाराचे रूप घेऊ शकतो, अशी माहिती डॉ. प्रज्ञावंत देवळेकर यांनी सामाजिक माध्यमावर दिली.



# नवस पूर्ण करत नगराध्यक्षांचा जल्लोष

## घोटण येथे पेढे तुला व नागरी सत्कार

**शेवगाव | शिवाजी घुगे**

नुकत्याच पार पडलेल्या शेवगाव नगरपरिषद निवडणुकीत माया अरुण मुंढे यांची नगराध्यक्षपदी तसेच उज्वला नंदकुमार यांची नगरसेवकपदी निवड झाल्याबद्दल श्रीक्षेत्र घोटण येथे पेढे तुला करून जाहिर नागरी सत्कार करण्यात आला. हा अभिनंदन सोहळा घोटण येथील पैलवान परमेश्वर थोरवे व तानाजी आंधळे यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. परमेश्वर थोरवे यांनी माया अरुण मुंढे नगराध्यक्षपदी निवडून याव्यात, असा नवस केला होता. तो नवस पूर्ण करण्यासाठी पेढे तुला करण्यात आली. या कार्यक्रमास गावातील प्रतिष्ठित नागरिक संख्येने उपस्थित होते. यावेळी माया अरुण मुंढे यांनी उपस्थितांशी संवाद साधताना सांगितले की, हा विजय केवळ माझा नसून संपूर्ण शेवगावच्या जनतेचा आहे. या विजयाने भारावून न जाता पुढील काळातही प्रामाणिकपणे जनतेची सेवा करणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली. त्यांनी घोटण येथील मल्लिकार्जुन ईश्वराचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले तसेच घोटण ग्रामस्थांचे मनःपूर्वक आभार मानले. परमेश्वर थोरवे व तानाजी आंधळे यांच्यासारखे कार्यकर्ते मिळणे हे भाग्याचे असल्याचे सांगत त्यांनी या यशाचे श्रेय तरुण पिढीला दिले. तरुणांनी राजकारणात सक्रिय सहभाग घेऊन जनतेच्या सेवेसाठी पुढे यावे, असा संदेशही त्यांनी यावेळी दिला. या कार्यक्रमास नितीन आव्हाड, काकासाहेब आव्हाड, अर्जुन घुगे, प्रकाश घुगे, संदीप फुंदे, विजय घुगे, अशोक घुगे, ज्ञानेश्वर बन, ज्ञानेश्वर थोरवे, गोपीचंद तिवारी, अरविंद दौंड, गोविंद दौंड, नामदेव घुगे, रावसाहेब खेडकर, ओम गर्जे, नवनाथ वनवे, महादेव मोटकर, गोकुळ भागवत व अशोक भागवत आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी माया अरुण मुंढे यांना शुभेच्छा दिल्या.

# राज्यात पुन्हा थंडीचा कडाका; तापमान दहा अंशाखाली

**श्रीरामपूर | शफीक बागवान**

नवीन वर्ष सुरू होण्यास अवघे चार दिवस शिल्लक असताना राज्यात पुन्हा एकदा थंडीचा कडाका वाढण्यास सुरुवात झाली. उत्तरेकडील शीतलहरी हळूहळू दक्षिणेकडे सरकत असल्याने महाराष्ट्रातील हवामानात लक्षणीय बदल जाणवत आहे. विशेषतः पहाटे आणि रात्रीच्या सुमारास गारठा अधिक जाणवत आहे. दिवसा काही काळ उबदारपणा जाणवत असला, तरी एकूणच थंडीचा प्रभाव कमी झालेला नाही. भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार, डिसेंबरअखेर वाऱ्यांच्या दिशेत बदल होण्याची शक्यता असून याचा थेट परिणाम तापमानावर होऊ शकतो. कोरड्या हवामानासोबत थंडीचा जोर राज्यात अनेक भागांत कायम राहणार आहे. उत्तर भारतात सक्रिय झालेल्या तीव्र थंडीच्या लाटेचे पडसाद महाराष्ट्रात उमटत आहेत. उत्तर आणि मध्य महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये किमान तापमान दहा अंश सेल्सिअसच्या खाली घसरले आहे. त्यामुळे सकाळी लवकर घराबाहेर पडणारे नागरिक, शेतकरी आणि कामगार वर्गाला कडाक्याच्या गारठ्याचा सामना करावा लागत आहे.

मराठवाड्याच्या अंतर्गत भागांमध्ये, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र पुण्यासह मध्य महाराष्ट्रात कडाक्याची थंडी जाणवण्याची शक्यता आहे. उत्तर महाराष्ट्रातही थंडीचा प्रभाव कायम राहणार असल्याचर हवामान खात्याने स्पष्ट केले आहे. विदर्भात पुन्हा एकदा तापमान दहा अंशाखाली जाण्यास सुरुवात झाली आहे. तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील पुणे, नाशिक आणि अहिल्यानगर यांसारख्या जिल्ह्यांमध्ये थंडीचा जोर कायम राहणार आहे. काही ठिकाणी किमान तापमान दहा ते बारा अंश सेल्सिअसपर्यंत खाली जाण्याचा अंदाज आहे. पुण्यात आकाश मुख्यतः निरभ्र राहणार असून सकाळच्या वेळेत विरळ धुक्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. उर्वरित महाराष्ट्रातही तापमानात पहाटे आणि संध्याकाळनंतर तापमान घटताना दिसले. येत्या सात दिवसात राज्यातील हवामान कोरडे राहणार असून नवीन वर्षात नागरिकांना गारठा जाणवू शकतो, असा अंदाज हवामान विभागाने दिला आहे.

**उबदार कपडे आणि शेकोट्यांचा आधार**

**थंडीने सर्वत्र डोक्यावर काढले आहे. लहान मुलांसह ज्येष्ठ नगरीकांनी उबदार कपडे तसेच शेकोट्यांचा आधार घ्यावा. मॉर्निंग वॉकला बाहेर पडणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांनी देखील या बाबीची काळजी घ्यावी. विशेषतः लहान बालकांसाठी आजारी पडू नयेत ही विशेष काळजी घ्यावी.**

**ॲड. रऊफ शेख**
ज्येष्ठ नागरिक, श्रीरामपूर



## बबनराव गायकवाड यांचे निधन

**श्रीरामपूर | रयत समाचार**

येथील जुन्या पिढीतील बबनराव लोभाजी गायकवाड (वय ८२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. ते परिगाबाई यांचे पती तर रमेश, भगवान, अनिल गायकवाड यांचे वडील होत.

# स्मार्ट इंडिया हॅकेथॉन ग्रँड फिनालेत विखे महाविद्यालयाला उपविजेतेपद

**अहमदनगर | विजय मते**

पंजाब येथील मोहाली येथे स्मार्ट इंडिया हॅकेथॉन २०२५ (Software Edition) चा ग्रँड फिनाले चंदीगड अभियांत्रिकी महाविद्यालय, मोहाली या अधिकृत नोडल सेंटरवर मोठ्या उत्साहात पार पडला. देशभरातील अव्वल २५ संघांनी या ३६ तासांच्या मॅरेथॉन कोडिंग स्पर्धेत सहभाग घेत विविध शासकीय विभागांनी दिलेल्या समस्या विधानांवर अभिनव सॉफ्टवेअर उपाय सादर केले. या प्रतिष्ठित राष्ट्रीय स्पर्धेत अहिल्यानगर येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत प्रथम उपविजेतेपद पटकावले. सुशांत मरकड, अविष्कार भोर, कृष्णकांत त्रिमुखे, ओम पाटील, वैष्णवी धोकटे आणि स्नेहा पाठक या सहा विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवला.




विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रकल्पाचे तज्ज्ञ परीक्षकांनी विशेष कौतुक केले असून, त्यांच्या नवोन्मेषी संकल्पना, तांत्रिक अचूकता, सामाजिक उपयुक्तता आणि वास्तव समस्यांवर आधारित उपाययोजना यांची राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली. अंतिम फेरीदरम्यान विद्यार्थ्यांनी सलग ३६ तास मेहनत घेत स्पर्धेत आपली गुणवत्ता सिद्ध केली. या विद्यार्थ्यांना प्रा. नितीन पोंधे, प्रा. प्राजक्ता डोलारे आणि प्रा. आश्विनी देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले. स्मार्ट इंडिया हॅकेथॉन ही देशातील सर्वात मोठी नवकल्पना स्पर्धा असून, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शासकीय व सामाजिक समस्यांवर तंत्रज्ञानाधारित उपाय सुचवण्याची संधी देते. मोहाली येथील ही अंतिम फेरी विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला राष्ट्रीय स्तरावर व्यासपीठ देणारी ठरली. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविंद्र नवथर, फाउंडेशनचे डायरेक्टर टेक्निकल प्रा. श्री. सुनील कल्हापुरे, डायरेक्टर जनरल डॉ. पी. एम. गायकवाड, फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील आणि जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.